
REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 3.8014(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 4 | JANUARY – 2017



# भाषा साहित्य समाज एक अनुबंध

प्रा.डॉ.काकासाहेब रामराव सुरवसे
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख,
बी.एस.एस.कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय ,
माकणी ता. लोहारा जि.उस्मानाबाद .

## प्रस्तावना :

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात माणूस कोणती ना कोणती भाषा बोलत असतो. विचार व कल्पना यासाठीही तो भाषेचाच वापर करीत असतो. भाषा ही गोष्ट माणसाच्या प्रत्येक क्षेत्राशी प्रत्येक विचाराशी, प्रत्येक कृतीशी निगडीत असतो. प्राणीमात्रांच्या तुलनेने मानवाने स्वतःची जी प्रगती करून घेतली तिच्या मुळाशी त्याची ही भाषाच आहे. भाषेशिवाय माणूस आणि समाजाशिवाय माणूस अशी कल्पना ही करता येत नाही. भाषेला आपले सांस्कृतिक संचित भाषेद्वारे जतन केले जाते. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सांस्कृतिक संचित संकृमित करण्याचे कार्य भाषेद्वारे होते म्हणूनच भाषेने माणूस घडविला व माणसानी भाषा घडवली भाषा माध्यमातूनच औपचारिक व अनौपचारिक शिक्षण होत असते भाषेतूनच मूल्य व्यवस्था निर्माण होते.

भाषा ही माणसाच्या दैनंदिन व्यवहाराची गरज भागविणारी साधन आहे. भाषेमुळे मानवी व्यवहार सुलभ होतात. परस्परांशी सुसंवाद साधून माणसा माणसाची मने जुळली जातात. त्याचप्रमाणे भाषेद्वारे स्वतःशी ही संवाद साधत असतो. मनातल्या मनात चिंतन करतो. स्वतःशी बोलतो अशा भाषाक्रियेतून आपण घडत जातो. समाजाला घडवत – घडवत विकसीत होत जातो. सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेत भाषेचा खूप मोठा वाटा आहे. भाषेचा अविष्कार मौखिक व लिखित अशा दोन्ही स्वरूपात होतो अविष्कार म्हणजे व्यक्तिमत्वाचे प्रकटीकरण असे प्रकटीकरण लेखक व समान्य माणूस ही करत असतो. वाङमय अभिव्यक्ती ही सर्जनशील भाषिक उपयोजनांद्वारे होत असते. भाषेचा सूचक व नवे अर्थ संदर्भ निर्माण करणारा वापर ही लेखक वाचक या दोघांना आनंद देणारा ठरत असते. आपली दैनंदिन व्यवहारीक भाषाही संज्ञापनाच्या गरजा भागविणारी असते. साहित्याची भाषा मात्र संज्ञापनाबरोबरच सौंदर्य निर्मितीचे ही काम करीत असते.

उदा. एखादा माणूस गोष्ट सांगतो तेंव्हा तो एकीकडे कथानक रचत असतो. अनुप्रासात्मक वाक्य रचनातून येणारे नादसौंदर्य अनुभवाची रूपकात्मक मांडणी वर्णनातले तपशील संवादातील नाटय अशा घटकांमुळे लेखकाचे कथन 'ललितरम्य' होते. भाषेच्या या वैशिष्टयपूर्ण वापरामुळे लेखकाच्या साहित्यात साहित्यमूल्य प्राप्त होते. भाषेच्या माध्यमातून व सौदंर्यपूर्ण रचनातून साहित्यनिर्मिती घडत असते. श्रवण, भाषण, वाचन व लेखनही भााषेची प्राथमिक कौशल्य आहेत. या कौशल्याचे परिणामकारक उपयोजन झाल्याने मानवी व्यवहार गतिशील व अर्थपूर्ण ठरतो. भाषा ही मानवाने केलेली निर्मिती आहे. भाषेचा अधिक चोखंदळपणे वापर करण्यासाठी निर्मितीशीलता वाढली पाहिजे. भाषा ही

सर्जनशीलतेचीच फलश्रुती आहे. माणूस हा निर्मितीक्षम म्हणजेच सर्जनशील प्राणी आहे. इतर प्राण्यामध्ये माणसाइतकी निर्मितीक्षमता दिसत नाही. प्राण्यांच्या बहुविध कृती हया ठराविक स्वरूपाच्या असतात. उलट सर्जनशीलता हे माणसांचे व्यवच्छेदक लक्षण आहे. भाषा निर्मिती ही माणसांची सर्जनशीलता कृती आहे. माणसाने कला निर्माण केल्या, मानवाने गरजेच्या पूर्तीसाठी वस्तू साधने निर्माण केली ही त्यांच्या सर्जनशीलतेचीच खुण म्हणावी लागेल, समाज, कुटूंब, सामाजिक संघर्ष, सांस्कृतिक संस्था, शासन संस्था यांची निर्मिती सर्जनशीलतेचीच खूण आहे. काहीतरी नवे निर्माण करण्याची माणसामध्ये उपजत ओढ आहे. या ओढीमुळेच मानवाने, संस्कृती, धर्म, कला, विज्ञान, तंत्रज्ञान यांना जो आकार मिळवितो तो भाषेच्या वापरामुळेच या सामाजिककरणाच्या प्रक्रियेत भाषेचा फार मोठा वाटा आहे.

'भाषा ही समाज निर्मित आहे'. या ऑरिस्टॉलच्या मताचा समाजशास्त्राच्या भाषाशास्त्राशी संबंध कळतो. भाषा ही सामाजिक संस्था असल्याने समाजाला भाषा हवी असते, भाषेला समाज हवा असतो. समाजाच्या सर्व अंगाचा सापेक्षाने विचार करणारे शास्त्र हे समाजशास्त्र असते. समाजाच्या संस्कृतीचे चित्र रेखाटनाना भाषेचा विचार ओघानेच येतो. भाषा आणि समाज या दोन्हीचा विकास हा परस्पराश्रेयाने होत असतो. शब्द वा अर्थ या दोन्ही बाजूनी भाषेत होणाऱ्या परिवर्तनामागे काही सामाजिक परिस्थिती असू शकते. सामाजिक परिस्थितीवरच भाषेतील शब्द वापरण्याच्या पध्दती व सवयी अवंलबून असतात. त्यातूनच भाषा अस्तित्वात येते. भाषा विषयी फ्रडिनंड म्हणतात की, ''भाषा आणि मानसाशास्त्र या दोन्हींचा मानसिक प्रवृत्तीशी, मनोव्यापार प्रक्रियांशी घनिष्ट संबंध आहे. भाषेतून विचार, भावनांचे मानसिक, अंतर्व्यापाराचे प्रकट व सुसंघटीत रूप म्हणजेच भाषा''[1] भाषेची प्रक्रिया मूलतः मानसशास्त्रीय आहे. तेंव्हा भाषाशास्त्राचा संबंध किती जवळचा आहे हे लक्षात येते. साहित्यिक समाजाचा घटक असल्याने त्यांच्या संवेदना त्या प्रभावानेच कार्यरत होतात. तसेच साहित्याचे माध्यम जी भाषा तीच एक समाजिक संस्था असल्याने समाज आणि साहित्य भाषा आणि मानव यांचे अतुट संबंध अपरिहार्यतेने प्रस्थापित होतात.

आधुनिक मराठी साहित्यामध्ये काळानुसार नव–नविन साहित्य प्रवाह जन्माला आलेले आपण पाहतो. एकूणच साहित्याचा सामाजिकतेचे स्वरूप व्यामिश्र आणि  गुंतागुतीचे असते. साहित्याच्या सामाजिकतेची सर्वात महत्वाची बाजू म्हणजे ज्या भाषेत साहित्य निर्मिती होते ती भाषा. ही भाषा समाज निर्मित असते. भाषेची सामाजिकता ही अतिशय स्पष्टपणे नैसर्गिक असल्याने भाषेच्या संदर्भात सुध्दा साहित्य हे सामाजिक ठरते. साहित्यिक आपला अनुभव व्यक्त करण्यासाठी जी भाषा वापरतो ती भाषा समाजातील व्यवहारातील जशीच्या तशी असत नाही. साहित्याची भाषा ही वेगळी असते. ती अनुभवातून येते तेवढीच ती लेखक ज्या मातीत जगतो त्या मातीतून त्याची भाषा येते साहित्यीकांचे मन,  सांस्कृतिक, सामाजिक पर्यावरणानुसार अनुभवाच्या अभिव्यक्तीसाठी भाषेचा शोध घेत असतो. त्या भाषेला त्या विशिष्ट पर्यावरणाचा रंग असतो. त्याच्या अवती–भवतीच्या समाजातील भाषेचा ढंग त्याच्या भाषेला आपोआपच येतो.

लेखकाच्या जीवनाविषयक विचार, त्याची अनुभव घेण्याची पध्दत, त्याची विचार करण्याची पध्दती, त्याची अभिरूची अशा विविध गुणांच्या वैशिष्टयांचा प्रभाव भाषेवर होवून साहित्यिकांची शैली निर्माण होते. माणसांचा आणि समाजाचा अतूट असा संबंध असल्याने सामाजिक संदर्भ साहित्यात अपरिहार्यपण येतात. त्याचबरोबर भाष हे साहित्यनिर्मितीचे माध्यम असते आणि भाषाही सामाजिक संस्था आहे. समाजातील व्यक्तीमधील विचार विनिमयाचे ते साधन असते. म्हणून भाषेच्या उपयोगाने समाजाचे चित्रण होतच असते. साहित्य आणि समाज यांच्यामध्ये अशा प्रकारांचा संबधाने साहित्य निर्माण होते. म्हणूनच साहित्यातील सामाजिकताही मानवी जीवनाचे दर्शन घडविणे हेच उद्दिष्ट असते. साहित्याच्या संदर्भात प्रा.ग.बा.सरदार म्हणतात, ''वाङमयाचा मुख्य विषयी मानवी जीवन आहे. सामाजिक संबंधाची विविध रूपे आणि त्यांतील जिव्हाळा, तणाव, सहकार्य व संघर्ष त्यांच्या मनातील श्रेय–प्रेय, व विचार व विकार आत्मप्रत्यय व अगतिकता इत्यादी द्वंद्वे या ना त्या स्वरूपात साहित्यात येतात''.[2] साहित्याविषयी मॅथ्यू अर्नोलड म्हणतो, काव्य म्हणजे जीवितांचे ललित परिक्षण होय.''[3] तर आचार्य अत्रे म्हणतात, ''समाजाचे जीवन त्यांच्या धडपडी, त्यांची दुःखे, त्यांच्या आकांक्षा ज्यात जीवंतपणे व्यक्त करतात त्याला साहित्य म्हणावे.''[4] साहित्यातील सामाजिकतेचे स्वरूप स्पष्ट करताना समाजाच्या अंतःप्रवाहाच्या, स्थितीगतीचा, जडण घडणीचा त्याच्या अभ्युदयाचा विचार त्यात अभिप्रेत आहे हे लक्षात येते. समाज जीवनात घडणाऱ्या अनेक विविध घडामोडीसंबंधीची उत्सुकता आणि ओढ जेथे कलावंताच्या मनाला वाटत असते ती ओढ आपल्या साहित्यातून मांडत असतो.

साहित्य आणि समाज याचा अनुबंध सांगताना प्रा.अविनाश सहस्त्रबुध्दे म्हणतात ''जीवन केवळ जगणे व साहित्य केवळ वाचणे हा सामान्य जीवन व्यवहार होय. उलट जे जगलो, त्याचे व जे वाचले त्याचे अर्थ करणे हा उच्च जीवन व्यवहार होय.''[5] साहित्य आणि समाज यांचा संबंध मुळीच गुंतागुंतीचा आणि जटील आहे. मानवी जीवनापासून साहित्य अलग करता येत नाही. मानवनिर्मित साहित्य कलेत सामाजिकता व्यापून राहिलेली असते. साहित्यातून चर्चेले गेलेले प्रश्न बहुधा सामाजिकच असतात. समाज लेखकाचे प्रभाव क्षेत्र असते. समाजाचे लेखकावर बरे वाईट परिणाम होत असतात. कारण साहित्यिक, वाचक आणि भाषा हे तीन्ही घटक सामाजिकतेत मोडतात. यामुळे साहित्याला एक सामाजिक परिणाम प्राप्त होते. साहित्यिकांच्या व्यक्तीमत्वात सामाजिकता पूर्णतः भिनलेली असते, कारण तो जसा समाजातून अनुभव घेतो तसा तो अनुभव व्यक्त करण्यासाठी माध्यम म्हणून भाषेचा वापर करतो. भाषेचा सामर्थ्या विषयी प्रा.रा.ग.जाधव म्हणतात, ''भाषा म्हणजे केवळ अक्षरांची चिन्हे नव्हेत, अक्षरांची जुळणीही नव्हे, अक्षरे ज्या शब्दांना घडवतात त्यांना समाजात खास अर्थपूर्णतः लाभलेली असते. ही अर्थपूर्णतः सामाजिक अनुभवाच्या, विचार विनिमयाच्या आधारे निर्माण झालेली असते.''[6] साहित्यिकाची साहित्य निर्मिती ही भाषिक आणि वाङमयीन पूर्व परंपरेतून आकाराला आलेली असते. प्रत्येक लेखकाची कलाकृती, निर्मिती संबंधीची एक स्वतंत्र्य शैली असते याच भाषा शैलीतून त्याचे व्यक्तीमत्व साकार होत जाते. एखाद्या साहित्यकृतीतील व्यक्तीरेखा साकार करण्यासही भाषा अधिक महत्वाची ठरते. त्याच्या मनाची होत असलेली घालमेलही सहज आणि नकळतपणे प्रकट होत जाते. घटना प्रसंगाचे दृष्य –चित्र मनचक्षू पूढे साकारत जाते. साहित्यिक भाषा अधिक प्रभावी होण्यासाठी त्या त्या बोली भाषेतील म्हणी, वाक्यप्रचाराची आवश्यकता घ्यावी लागते. यामुळे पात्राची व्यथा अधिक स्पष्ट होते. उपमा, प्रतिमांच्या वापरामुळे अनुषंगिक अभिव्यक्तीला अधिक सामर्थ्य प्राप्त होते. त्यात सरळपणा आणि साधेपणा अधिक जाणवतो. त्यामुळे अनुषंगिक प्रसंग–घटना, भाव–स्वभाव आणि वृत्ती–कृती थेट आशयाला भिडतात व उपमा–प्रतिमांच्या वापरामुळे अनुषंगिक प्रसंगातील नेटकेपणा व नेमकेपणा अधिक प्रभावी होत जाते.

भाषेच्या माध्यमातून समाजाचे आकलन होवू शकते. समाज संपन्न प्रगत असतो. तशीच भाषाही लेखकाचे अनुभव भाषेच्या माध्यमातून साहित्यात प्रतिबिंतीत झालेले असते. विशिष्ट जीवनानुभव विशिष्ट भाषेशिवाय अर्थपूर्ण वाटत नाही. साहित्यिकाची साहित्य निर्मिती ही भाषिक आणि वाङमयीन पूर्व परंपरेतून आकाराला आलेली असते. जूनी पूर्व परंपरा व निर्मिती यांच्या साकल्याने विचार करून लेखक अनुभूती व कल्पना याद्वारे भाषेच्या साहयाने कलाकृती निर्माण करतो. म्हणूनच भाषेला महत्वाचे स्थान आहे.

## संदर्भ ग्रंथ

1) प्रा. आनंद भंडारे : भाषाशास्त्र, निर्मल प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती–2004, पृ.26.

2) गं.बा.सरदार : प्रबोधनातील पाऊलखूणा, संपा निर्मलकुमार फडकुले, कॉन्टिनेंटल प्रकाशन,पुणे, प्रथम आवृत्ती 1978 पृ.18.

3) डॉ. शिवकुमार सोनाळकर : स्त्रियांचे कथालेखन, प्रज्ञा प्रबोध प्रकाशन प्रथम आवृत्ती 2012, पृ.20.

4) तैत्रव पृ.19.

5) प्रा.अविनाश सहस्त्रबुध्दे : समाज आणि साहित्य, मेहता प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती 1996, पृ.03.

6) डॉ. शिवकुमार सोनाळकर : स्त्रियांचे कथालेखन, प्रज्ञा प्रबोध प्रकाशन प्रथम आवृत्ती 2012, पृ.16.